**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## ग्रामीण भागाच्या विकासासाठी शिक्षित युवकांनी पुढाकार घ्यावा - कुलगुरू डॉ. विलास भाले

## विद्यापीठात उन्नत भारत अभियान विदर्भ व मराठवाडास्तरीय कार्यशाळेचे आयोजन

अमरावती.

शिक्षित युवकांनी विचार बदलण्याची गरज असून ग्रामीण भागाच्या विकासासाठी, तेथील जनतेच्या व शेतीच्या समृद्धीसाठी, पीक उत्पादनाच्या शाश्वत वाढीसाठी पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. शिक्षण क्षेत्रातून अनेक अभियंते, पदवीधर निर्माण झाले आहेत, त्यांच्या शिक्षणाचा उपयोग खऱ्याअर्थाने आज ग्रामीण भागाला होण्याची नितांत गरज असून त्यादृष्टीने उन्नत भारत अभियान मैलाचा दगड ठरेल, असे प्रतिपादन डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास भाले यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व एम.एच.आर.डी.सी. यांचे संयुक्त विद्यमाने उन्नत भारत अभियानांतर्गत विदर्भ व मराठवाडास्तरीय एकदिवसीय प्रादेशिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले, त्याप्रसंगी उद्घाटक म्हणून ते बोलत होते.

व्यासपीठावर अध्यक्षस्थानी अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.एस.पी. काणे, छिंदवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजन वेळूकर, तंत्रशिक्षण सहसंचालक डॉ.डी.व्ही. जाधव, अमरावती विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. हेमंत देशमुख, आय.आय.टी. दिल्ली, उबाचे तज्ज्ञ डॉ. विवेक कुमार, डॉ. आशिष सिंग, विदर्भ उबाचे सह-समन्वयक तथा आय.आय.एल. चे संचालक डॉ.डी.टी. इंगोले, विदर्भ उबा प्रादेशिक समन्वयक तथा राज्य प्रवर्तक डॉ. अर्चना बारब्दे, पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे डॉ.पी.डी. जाधव, उबाचे समन्वयक तथा रा.से.यो.चे प्रभारी संचालक डॉ. राजेश बुरंगे उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. भाले उद्घाटन झाल्याची घोषणा करून पुढे म्हणाले, गावाचा विकास कसा करता येईल, हा प्रश्न सर्वांसमोर असला पाहिजे. सर्व अभियांत्रिकी पदवीधरांना रोजगार मिळू शकतो; पण त्यासाठी सर्वांनी पुढे येण्याची गरज आहे. पावसाचे सरासरी प्रमाण फरकाने कमी जास्त राहीले आहे. पाणी संवर्धन, नद्यांचे प्रदूषण, शेतकऱ्यांच्या मालाला प्रक्रिया करुन अधिक किंमतीत मिळवून देणे, विदेशातून तंत्रज्ञान विकत न आणता, ते आपल्याच देशात कसे निर्माण करता येईल, शेतीसाठी लागणारे तंत्रज्ञान विकसित करणे यांसारख्यां अनेक बाबींवर आमच्या विद्यार्थ्यांना काम करण्याची उज्वल संधी आहे आणि त्यातून रोजगारदेखील मिळू शकेल. या संधीचा सर्व विद्यार्थ्यांनी फायदा घ्यावा व ग्रामीण विकासामध्ये हातभार लावावा, असे आवाहन त्यांनी केले.

कुलगुरू डॉ. राजन विरूळकर म्हणाले, गांवात परिवर्तन आणण्यासाठी उबा महत्वाचे व्यासपीठ आहे. कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी पुढाकार घेतला, यासाठी त्यांचे जितके कौतुक करावे तितके कमीच आहे. यापूर्वी विद्यापीठे स्वतःच्या क्षेत्रापुरतेच मर्यादित राहून कार्य करायची, ते आता उबा मुळे बदलणार आहे. शिक्षण घेतले, पदवी मिळाली, रोजगार नाही. पाच वर्षांनंतर कुठल्या प्रकारचे रोजगार उपलब्ध असतील, हे सुद्धा माहित नाही. जग झपाट्याने बदलत आहे, शहरे फुगत आहेत, गांवे ओस पडत आहेत, हे असेच सुरु राहीले तर आपण मागे राहू. ग्रामीण भागाचा विकास झाला तरच जीवंत राहू, याचा विचार करण्याची आज गरज आहे. स्वातंत्र्य लढ्यापेक्षाही मोठी संधीरुपी लढाई युवकांना करायची आहे. या संधीचे ते सोने करुन ग्रामीण भागाचा विकास करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कुलगुरू डॉ.एस.पी. काणे म्हणाले, ग्रामीण भागाचा विकास झाल्याशिवाय देशाचा विकास होणार नाही. उबा तून स्मार्ट व्हिलेज नक्की होईल. महात्मा गांधीजींच्या तत्वज्ञानातून ही योजना पुढे आली आहे. राष्ट्रसंतांनी शहरीगीता न लिहीता, ग्रामगीता लिहून ग्राम विकासाचे महत्व सर्वांना पटवून दिले. आमच्या विद्यार्थ्यामध्ये क्षमता आहे, त्यांच्या ज्ञानाचा उपयोग ग्रामोन्नती करण्यासाठी व्हावा, या उद्देशाने सर्व विद्यापीठे एकत्रित आली आहेत. एवढेच नव्हे; तर एकत्रितपणे काम करीत आहे, हीच खऱ्याअर्थाने मोठी उन्नती ठरेल, असे सांगून उबा मध्ये सर्वांनी ताकदीने कार्य करावे व ग्राम विकासामध्ये मोठा हातभार लावावा, असे आवाहन त्यांनी केले.

उबाचे अध्यक्ष पद्मश्री डॉ. विजय भटकर यांनी दूरध्वनीवरुन मार्गदर्शन करतांना सांगितले, विदर्भात शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणावर आहेत. उबाच्या माध्यमातून सर्व विद्यापीठे एकत्रितरित्या काम करीत असून ग्राम विकासासाठी ग्रामस्थांचे जीवन सुकर करण्यासाठी ही एक मोठी संधी असून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा पुढाकार महत्वाचा ठरला असल्याचे ते म्हणाले.

अध्यक्षीय भाषण करतांना कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर म्हणाले, अभ्यासक्रमाच्या बाहेर जावून काम करण्याची सवय शिक्षकांना नाही. शिक्षण क्षेत्राचा विकास झाला; पण त्याचा उपयोग समाजाला व्हायला पाहिजे होता. अनेक बाबींवर संशोधन झाले; पण ग्रामीण भागातील असलेल्या समस्यांवर संशोधन होण्याची आवश्यकता होती. उबा मध्ये आय.आय.टी., केंद्रीय विद्यापीठे आणि राज्यस्तरीय विद्यापीठे कार्यरत असून ग्रामीण भागातील समस्यांवर आता खऱ्याअर्थाने संशोधन होवून त्याचा फायदा ग्रामीण भागाला होणार, ही निश्चितपणे फार मोठी उपलब्धी ठरेल. अनेक क्षेत्राचा विकास झाला, तो त्या क्षेत्रापुरता मर्यादित राहीला. आता सर्व क्षेत्रे एकत्रित येवून समाजाचा सर्वांगीण विकास करतील. शिक्षण हे समाजासाठी आहे, हा विश्वास समाजाला निश्चितपणे बसेल. विद्यापीठे आणि समाज एकमेकांशी जोडला जाईल. शिक्षणासोबत सामाजिक चळवळ पुढे नेण्यासाठी सर्वजण पुढे येतील व त्यातून सर्वांगीण विकास साधल्या जाईल, असेही ते म्हणाले.

विद्यापीठ गीताने व कर्मयोगी संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. ग्रामगीता देवून पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक भाषणातून डॉ. अर्चना बारब्दे यांनी उबा आणि युवा याबाबत सविस्तर माहिती दिली. संचालन कु. पर्णती पावडे हिने, तर आभार आय.आय.एल.चे संचालक डॉ.डी.टी. इंगोले यांनी मानले. उद्घाटन कार्यक्रमाला वित्त व लेखा अधिकारी डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य डॉ.ए.बी. मराठे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. दिनेश सातंगे, व्य.प. सदस्य डॉ. प्रसाद वाडेगांवकर, विभागप्रमुख डॉ.एस.के. ओमनवार, डॉ. मोना चिमोटे, डॉ. नितीन फिरके, डॉ. गजानन गुल्हाने, डॉ.एस.एफ.आर. खाद्री, गोंडवाना विद्यापीठाचे डॉ. मनिष उत्तरवार, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी, विद्यापीठ परिक्षेत्रातील महाविद्यालयांचे शिक्षक याशिवाय औरंगाबाद, नांदेड, जळगांव, रामटेक, नागपूर, गोंडवाना, वर्धा येथील विद्यापीठ व संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. १६/०३/२०१९.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी